प्रत मिळाली
Kamble
10/01/2025

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** हातकणंगले

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0018 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/01/2025 21:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 07/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/01/2025
**Time From (वेळेपासून):** 13:16 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/01/2025 **Time (वेळ):** 21:41 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/01/2025 21:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुरवठा विभाग कार्यालय , हातकणंगले,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** महेंद्र नरसिंगा कांबरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मौजे वडगाव,हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मौजे वडगाव,हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9130957173

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष मधुकर घुणके | | | 1. घुणके मळा ,यळगुड, हातकणंगले,हातकणंगले , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शैलेंद्र महादेव डोईफोडे | | | 1. सनगर गल्ली,पेठ वडगाव, हातकणंगले,हातकणंगले , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 5 भारतीय चलनी नोटा | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 10/01/2025

मी महेंद्र नरसिंगा कांबरे, वय- 40 वर्षे, व्यवसाय- चालक, रा.मौजे वडगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर मोबाईल नंबर 9130957173 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 06/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे येवुन पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांची भेट घेवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, शासनाचे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत समाजातील गरीब लोकांना प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. सदर योजनेचा माझे कुटुंबाला तसेच गावातील इतर लोकांना लाभ मिळावा म्हणुन मी जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर पुरवठा विभाग येथे सन 2022 मध्ये अर्ज केलेला होता. सदर अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणुन मी दिनांक 05/02/2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे आयोजीत केलेल्या लोकशाही दिन मध्ये अर्ज केलेला होता. त्यावेळी तेथे मला माझा अर्ज तहसिलदार हातकणंगले यांचेकडे पाठविला आहे असे समजले. त्यानंतर मी हातकणंगले तहसिलदार तसेच हातकणंगले पुरवठा अधिकारी कार्यालयात सदर कामाबाबत सातत्याने पाठपुरावा करीत होतो. आमचे काम पुरवठा विभागातील कर्मचारी सुभाष घुणके हे करीत होते. दिनांक 03/12/2024 रोजी मी घुणके यांना भेटलो त्यावेळी घुणके यांनी मला माझे नाव, गावातील इतर 08 लोकांची नावे पुरवठा कार्यालयातील वरच्या साहेबांना सांगुन प्राधान्य कुटुंब योजनेत समाविष्ठ केली आहेत असे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला माझे नाव सदर योजनेत समाविष्ठ केले आहे त्याकरीता तुम्ही 4000/- रूपये मला दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना जास्त पैसे होतात काहीतरी कमी करा असे म्हणालो. त्यावेळी त्यानी मला सदरचे पैसे वरच्या साहेबांपर्यंत दयावे लागतात त्यामुळे पैसे काही कमी होणार नाहीत असे म्हणाले. मी त्यांना पैशांची जुळणा करून भेटतो असे सांगून तेथून निघून आलो होतो. त्यानंतर मी मागील आठवडयात घुणके यांना भेटलो त्यावेळी त्यांनी परत माझेकडे प्राधान्य कुटुंब योजनेत नाव समाविष्ठ केली आहेत व तुमचे काम झाल्याने त्याकरीता 4,000/- रूपये दया असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा होत आली आहे लवकरच तुम्हाला येवुन भेटतो असे सांगितले होते. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रारी अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील मॅडम यांचेकडे दिला होता.

मी दिनांक 07/01/2025 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास घुणके यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला दिनांक 07/01/2025 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास हातकणंगले ते रामलिंग जाणारे रोडलगत मोकळ्या जागेत थांबणेस सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 07/01/2025 रोजी पाटील मॅडम व त्यांचा स्टाफ तेथे आले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पाटील मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन पुरवठा विभागातील कर्मचारी घुणके यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 वराळे यांना घुणके यांना भेटणेकरीता पाठविले. मी हातकणंगले पुरवठा विभागाचे कार्यालयात गेलो त्यावेळी तेथे मी सुभाष घुणके यांना भेटलो त्यावेळी आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले

त्यावेळी मी त्यांना सदर योजनेत नऊ नावे झालीत आता असे म्हणालो त्यावेळी घुणके "नाय जेवढी एक्स्ट्रा काय नाही आता म्हणूनच तुम्हाला सांगितलं आता काय काढू नका मग काय ते आता साहेबांना विचारून, कारण मीच एक दोन जादा झाल्यात माझेकडूनचं त्यात साहेब विचारत्यात कुणाला माहित असा विषय झालाय साहेबांनाच भेट घ्या... एक्स्ट्रा काय आता काय असेल तर साहेबांची भेट घ्या. बरं काय शिल्लक राहिलयं जास्त झालयं ना " असे म्हणाले. त्यावेळी मी जास्त झालय असे म्हणालो. त्यावेळी मी त्यांना अजुन किती वेळ आहे असे विचारले त्यावेळी घुणके यांनी मी एक थोडा वेळ जेवायला जाणार आहे अर्ध्या पाउन तासनं या असे म्हणाले. त्यावेळी मी घुणके यांना किती बोललाय... असे म्हणालो त्यावेळी घुणके यांनी "सांगितलयं की तुम्हाला मागचं तस काय बोलायचं माप म्हणत्यात तुम्हाला" असे म्हणाले. त्यावेळी मी बोला की असे म्हणालो त्यावेळी घुणके यांनी " तीन म्हणून सांगिलयं की मी अडीच तीन पर्यंत सांगितल्या की" असे म्हणाले त्यावेळी मी किती असे म्हणालो त्यावेळी घुणके यांनी " अडीच तीन पर्यंत देतो म्हटलायसा ना तुम्ही" असे म्हणाले. त्यावेळी मी अडीच तीन असे म्हणालो. त्यावेळी घुणके "हुं "असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना अर्ध्या तासात येतो असे सांगितले. त्यानंतर तेथुन मी व पंच परत निघुन येवुन पाटील मॅडम यांना घडलेली हकीकत सांगितली. घुणके यांनी माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम ही अडीच तिन हजार अशी नेमकी नसल्याने घुणके हे किती लाच रक्कम मागणी करतात याची खात्री करणेकरीता माझे मोबाईल नंबर वरून, घुणके यांचे मोबाईल नंबर 8551868775 वरती फोन केला असता त्यानी फोनवर लाचेच्या रक्कमेबाबत बोलणेस नकार देवुन फोन बंद केला. त्यावेळी मी पाटील मॅडम यांना घुणके यांनी माझेकडे अडीच तिन हजार रूपयांची लाच मागणी केली आहे त्याप्रमाणे मी घुणके यांचेकडे 2500/- रूपये घेवुन जातो असे सांगितले.

त्यानंतर पाटील मॅडम यांनी सापळा कारवाई सुरू केली. मला व पंचाना अँथ्रासिंन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 2500/- रूपये माझे पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या खिशात ठेवुन मला योग्य त्या सुचना देवून,पुरवठा विभागातील कर्मचारी सुभाष घुणके यांना भेटण्याकरीता जाण्याचे सांगितले. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच वराळे असे माझे मोटार सायकलवरून निघालो त्यावेळी माझे पाठोपाठ सापळा पथक आले. मी पुरवठा विभाग हातकणंगले चे कार्यालयात आलो. त्यावेळी माझे पाठापोठ सापळा पथकातील सर्वजण आजुबाजुला थांबले. त्यावेळी मी जावुन घुणके साहेबांना भेटलो त्यावेळी मी तुम्ही सांगितल्या प्रमाणं तीन हजार रूपये जमले नाहीत अडीच हजार रूपये आणलेले आहेत असे म्हणालो त्यावेळी घुणके बर असे म्हणाले. त्यावेळी आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी त्यांना सर्वांचे काय असे विचारले त्यावेळी घुणके यांनी "सर्वाचं सगळया सकट ऐवढं वैयक्तीक काम काय ऐवढं मोठ नाही ऐवढं मोठ काय करत नाही मी हाय ते सांगितल म्हणून मी तीन सांगितल्यालं" असे म्हणाले त्यावेळी मी मग आता अडीच हजार असे म्हणालो. त्यावेळी घुणके यांनी "आज अर्ध दया तुम्ही बाकीचं एक, नंतर तुमचं तुम्ही वाटलं तर" असे म्हणुन आणखीन एक हजार रूपये मागीतले. त्यावेळी मी आता तुम्हाला अडीच हजार रूपये मी देतोय हु असे म्हणालो. त्यावेळी घुणके यांनी मला दोन मिनट असे म्हणुन, वातावरण नाही व्यवस्थित, नको बघू पुढच्या वेळी. नाही तर नंतर बघूया एक दोन तीन दिवस थांबा असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी माझेकडुन लाच रक्कम स्विकारली नसलेने, मी परत पुर्वी थांबलेल्या ठिकाणी आलो. माझे पाठोपाठ पाटील मॅडम, पंच 2 व स्टाफ परत आले. तेथे मी पाटील मॅडम यांना घडलेली हकीकत सांगितली. हातकणंगले पुरवठा अधिकारी कार्यालयातील कर्मचारी सुभाष घुणके यांनी लाचेची रक्कम घेण्याकरीता संमती दर्शविली होती, परंतु त्यांना कशाचा तरी संशय आलेने त्यांनी वातावरण व्यवस्थीत नाही दोन तीन दिवसांनी बघू, फोन करतो असे म्हणून माझेकडुन लाच स्विकारली नसल्याने चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 10/01/2025 रोजी मी पाटील मॅडम यांना फोन करून घुणके यांनी दोन तिन दिवसानी बोलाविले असल्याचे सांगितले असल्याने त्याप्रमाणे मी आज रोजी घुणके यांना भेटण्यास जाणार आहे. पाटील मॅडम यांनी त्या, पंच व स्टाफ सह पुर्वी थांबलेल्या ठिकाणी येत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे ते सर्वजण ठरलेल्या ठिकाणी पोहचले. पाटील मॅडम यांनी सापळा कारवाई सुरू केली. सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 2500/- रूपये माझे शर्टचे वरच्या डाव्या खिशात ठेवुन मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या व पुरवठा विभागातील कर्मचारी सुभाष घुणके यांना भेटण्याकरीता जाण्याचे सांगितले. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच वराळे असे माझे मोटार सायकलवरून निघालो. माझे पाठोपाठ सापळा पथक आले. मी पुरवठा विभाग हातकणंगले चे कार्यालयात आलो. माझे पाठापोठ सापळा पथकातील सर्वजण आजुबाजुला थांबले. मी घुणके साहेबांना त्यांचे कार्यालयात भेटलो त्यावेळी घुणके यांनी मला हाताने थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने घुणके आले. मी त्यांचे कार्यालयात बसलो होतो त्यावेळी आमचेत त्यांचे साहेबांचे कामाचे अनुषंगाने बोलने चालु होते. त्यावेळी घुणके यांचे समोर एक इसम येवुन बसला त्यावेळी घुणके यांनी त्यांचे

समोर बसलेल्या माणसाकडे बोट करून त्या माणसाकडं दया असे म्हणाले. त्यावेळी मी कुणाकडं असे विचारले " त्यावेळी घुणके यांनी त्या माणसाला हे बघा ये शैलेश हेन्ही देत्यात ते घे जावा, आपला माणूस हाय" असे म्हणाले. त्यावेळी मी देवू का तेच्याकडं एक मिनीटं देतो असे म्हणालो त्यावेळी घुणके यांनी " दया आपला मित्र हाय तो" असे म्हणाले त्यावेळी मी अं देवु असे म्हणालो त्यावेळी घुणके "शंभर टक्के आपलाच माणूस हाय तो" असे म्हणाले. त्यावेळी "मी अडीच हजार रूपये देतोय" असे म्हणालो त्यावेळी घुणके "ठिक ठिक हाय दया" असे म्हणाले. म्हणुन मी घुणके यांनी माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम त्यांचे सांगणेवरून शैलेश नावाचे माणसाकडे दिली व "अडीच हजार रूपये हाईत मोजुन घ्या हाअत काय" असे म्हणालो त्यावेळी शैलेश "हाईत" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना राहीलेले एक हजार घुणकेच्याकडं देतो नंतर, असे म्हणालो. त्यावेळी शैलेश बर चालतय असे म्हणाला. त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच पाटील मॅडम आणि त्यांचा स्टाफ तेथे आला. त्यावेळी सापळा पथकाने लाच स्विकारलेल्या रक्कमेसह शैलेश व पुरवठा कार्यालयातील कर्मचारी घुणके यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही हातकणंगले पोलीस ठाणे येथे येवुन पुर्ण करण्यात आली. त्यावेळी मला त्यांची नावे 1) सुभाष मधुकर घुणके, वय - 34 वर्षे, पद - कॉम्प्युटर ऑपरेटर,(खाजगी इसम) पुरवठा कार्यालय हातकणंगले रा. घुणके मळा यळगुड, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर 2) शैलेंद्र महादेव डोईफोडे, वय - 22 वर्षे, ,(खाजगी इसम) रा. सनगर गल्ली, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर अशी असल्याचे समजले.

तरी शासनाचे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत समाजातील गरीब लोकांना प्राधान्य कुटुंब योजनेत माझे नाव समाविष्ठ केले आहे म्हणुन पुरवठा विभाग हातकणंगले कार्यालयात काम करणारे सुभाष मधुकर घुणके यांनी माझेकडे पुरवठा कार्यालयातील साहेबांनी तुमचे काम पुर्ण केले आहे त्याचे पैसे दयावे लागतील असे म्हणुन स्वतःसाठी अप्रामाणिकपणे व बेकायदेशिरपणे तीन हजार रूपयांची मागणी करून तडजोडी अंती 2500/- रूपये लाचेची मागणी केली.व सदरची लाच रक्कम त्यांचा जोडीदार शैलेंद्र महादेव डोईफोडे यांचेकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी 2500/- रूपये लाच रक्कम सुभाष घुणके यांचे समक्षच शैलेंद्र डोईफोडे यांचेकडे दिली असता, शैलेंद्र यांनी माझेकडुन बेकायदेशिरपणे 2500/- रूपये लाच रक्कम स्विकारले नंतर त्या दोघांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी सुभाष घुणके व शैलेंद्र डोईफोडे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sharad Shankrrao Memane (I (Inspector)) / POBN84064 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sharad Shankrrao M
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84064